| MHSN110001222011 | नियमित दिवाणी दावा क्र.२८/२०११<br>सचिन साळुंखे / निवृत्ती साळुंखे |
|---|---|

## निशाणी १३९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र.१क यांचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले आहे की, सदर कामातील प्रतिवादी क्र.१क हे दिनांक ३१/१२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयताला अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस असून त्यांना अभिलेखावर घेण्यात यावे अशी विनंती वादी यांनी केलेली आहे. मयत प्रतिवादी यांना अर्जात नमूद सोडून इतर वारस नाहीत. त्यामुळे, त्यांनी अर्ज मंजूर करावा व तशी दुरुस्ती दाव्यात होवून मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून असे नमूद केले आहे की, सदरचा अर्ज मान्य व कबूल नाही. अर्जासोबत कोणताही पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१क यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. सबब, मयत प्रतिवादी क्र.१क यांचे

वारस अभिलेखावर घेणे दाव्याच्या अंतिम निराकरणासाठी आवश्यक आहे. असे न केल्यास विनाकारण गुंतागुंत वाढून प्रकरणांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.१क यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना दाव्याच्या कामी समाविष्ट करण्यात यावे.

३. वादीने तशी दुरुस्ती करावी व दुरुस्त दावा प्रत द्यावी.

४. सहा. अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये सदर दुरुस्तीची नोंद करुन घ्यावी.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.07.19 17:06:13 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १९/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 19/07/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 19/07/2025 |
| Order uploaded on | : | 19/07/2025 |